अपिल क्रमांक २४/२०१७

**श्री. सईद अब्दुल अजीज पिरजादे,**

विरुध्द...

**संगमेश्वर शिक्षण संस्था व इतर**

**<u>निशानी क्र. २९अ खालील आदेश</u>**

(दिनांक ०८ जानेवारी २०२५)

प्रस्तुतचा अर्ज हा अपिलकार यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेतील आदेश ४१ व नियम २७ अन्वये दाखल करुन पुरावा देण्यासाठी संधी देण्याकामी विनंती केली आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे मांडून अर्जास विरोध दर्शविला.

२. अपिलकार यांच्या कथनाप्रमाणे चौकशीसमितीने त्यांना पुरावा देण्याची संधी दिली नाही त्यामुळे ते प्रस्तुतच्या अपिलाचे कामी पुरावा सादर करु इच्छीत आहेत. चौकशी समिती एकतर्फा व पूर्वग्रहदुषित कारवाई करीत असल्याने त्यांनी फौजदारी प्रकरणे व दिवाणी प्रकरणातील कागदपत्रे सादर करु दिली नाहीत तसेच त्यांचे मुलाचे नुकसान होण्याकरीता खोटा प्रस्ताव पाठवून त्यास दहावीचे बोर्ड परीक्षेस बसू दिले नाही. त्याबाबतचे सर्व कागदपत्रे अपिलकार यांच्या बचावाकामी दाखल करणे गरजेचे आहे. याउलट, प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे अपिलकार यांनी सदरचे कागदपत्रे स्वतःहून चौकशी समिती समक्ष दाखल केले नाहीत, त्यामुळे चौकशी समितीने ते नाकारण्याचा प्रश्न येत नाही. तसेच अपिलकार यांनी नियम ३७ (४) प्रमाणे त्यांचे जादाचे म्हणणे दाखल करतानादेखील सदर कागदपत्र दाखल केले नाहीत. सदरचे कागदपत्र हे नवीन नसून चौकशी समिती कामकाजाच्या पूर्वीचे अथवा दरम्यानचे आहेत. त्यामुळे ते नवीन शोध या संज्ञेत बसत नाहीत. सबब प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. उभय विद्यमान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या लेखी कैफियतीप्रमाणे युक्तीवाद सादर केला. जाब देणार यांचे विद्यमान विधिज्ञ श्री. पाटील यांनी सदरचे कागदपत्र हे नवीन नसून चौकशी समिती कामकाजाच्या पूर्वीचे अथवा दरम्यानचे आहेत. त्यामुळे ते नवीन शोध या संज्ञेत बसत नाहीत, असा युक्तीवाद केला.

५.          अपिलकार यांचे विद्यमान विधिज्ञ श्री. गायकवाड यांनी त्यांचे युक्तीवादात चौकशी समिती एकतर्फा व पुर्वग्रहदुषित कारवाई करीत असल्याने त्यांनी फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणातील कागदपत्रे तसेच त्यांचे मुलाचे नुकसान होण्याकरीता खोटा प्रस्ताव पाठवून त्यास दहावीचे बोर्ड परीक्षेस बसू दिले नाही, त्यासंबंधीचे कागदपत्र सादर करु दिली नव्हती. सदर कागदपत्र निशानी ३० बरोबर सादर केले आहेत ते सर्व दाखल करुन घ्यावेत . सदर कागदपत्रे अपिलकार यांच्या बचावाकामी गरजेचे आहे. त्याकरीता त्यांनी न्यायनिवाडे सादर केले.

६.          प्रकरणाची एकूण परिस्थिती पाहता व उभयंतांच्या युक्तीवादावरुन हे स्पष्ट होते की, अपिलकार हे प्रस्तुत अर्जान्वये निशानी ३० वरील दस्त दाखल करुन कागदोपत्री पुरावा सादर करु इच्छीत आहेत. निशानी ३० बरोबर दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता सदर कागदपत्र हे चौकशी दरम्यानचे पत्रव्यवहार, अभिलेख असल्याचे तसेच कथित फौजदारी, दिवाणी प्रकरणाबाबत संबंधित असल्याने ते न्यायपटलावर घेण्यास अन्यायाचे होणार नाही. सदर कागदपत्रांचे प्रासंगिकता, अस्सलपणा हे अंतिम युक्तीवादाच्यावेळी विचाराधीन ठेवणे न्यायोचित होईल. त्याचबरोबर बचावपक्षास त्यावर युक्तीवाद मांडण्याची संधी देखील मिळेल, सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे.

७.          प्रस्तुतचा अर्ज मंजूर करुन अपिलकार यांना कागदोपत्री पुरावा सादर करण्याची परवानगी देण्यात येते. तसेच निशानी ३० वर योग्य ते आदेश पारीत करणेत येतील याची उभयंत्यांनी नोंद घ्यावी.

Digitally signed by VAISHALI NIVRUTI DHAVLE
Date: 2025.01.23 17:56:57 +0530

तारीख – ०८/०१/२०२५                                    (वै. नि. ढवळे)
ठिकाण - कोल्हापूर                                      पीठासीन अधिकारी,
                                                  शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर.